

दैनिक
सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •



• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २०७ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार दि.३ जून २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

घरातील कार्यक्रमाला आम्ही एकत्र येतोच:आमचे विचार वेगवेगळे, कुटुंब म्हणून सोबत असतो

दोन्ही पवार एकत्र येण्यावर अजित पवारांचे वक्तव्य

पुणे (वृत्तसंस्था)–मागील काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याबाबत चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहेत. पुण्यात रविवारी शरद पवार आणि अजित पवार एकाच व्यासपीठावर दिसल्याने पुन्हा एकदा या चर्चांनी जोर धरला आहे. यावर बोलताना अजित पवार म्हणाले, आमचे विचार वेगवेगळे असले, तरी कुटुंब म्हणून सोबत असतो. घरातील कार्यक्रमाला आम्ही एकत्र येतोच. ते आज बारामतीत माध्यमांशी बोलत होते.पुण्यातील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटमध्ये साखर उद्योग व कृषी क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराबाबत आयोजित एका कार्यक्रमात अजित पवार आणि शरद पवार यांनी सहभाग घेतला होता. यावेळी शरद पवार, अजित पवार आणि शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांच्यात बंद दाराआड चर्चा झाली, अशी माहिती आहे. या भेटीनंतर पुन्हा एकदा दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चांना उधाण आले.



आम्ही सुख-दुःखात एकमेकां सोबत असतोच

साखर संकुलात विविध नेत्यांसोबत बैठक सुरु होती. त्यावेळी अजित पवार बंद दाराआड चर्चा करत होते, अशी बातमी कुणीतरी दिली. अरे काय चर्चा? -ख तंत्रज्ञानाचा वापर करुन शेतकऱ्यांचे उत्पादन कसे वाढेल याबाबत चर्चा झाली, असे अजित पवार यांनी यावेळी स्पष्ट केले.दोन्ही पवार कुटुंब एकत्र येण्याबाबत भविष्यात काय चित्र दिसेल, असा प्रश्न माध्यम प्रतिनिधींनी अजित पवारांना विचारला असता, माझ्या मुलाच्या साखरपुड्याला ते सगळे आले होते. घरातील कार्यक्रम असतील, तर त्याठिकाणी कुटुंब म्हणून आम्ही एकत्र येतोच. विचारधारा वेगवेगळी आहे. परंतु कुटुंब म्हणून बाकीच्या बाबतीत सुख-दुःखात एकमेकांसोबत असतोच, अशी प्रतिक्रिया अजित पवारांनी दिली.राज्य सरकारच्या लाडकी बहीण योजनेत मोठ्या प्रमाणावर अपात्र लाभार्थ्यांनी नोंदणी केली असून, या योजनेत घोटाळा झाल्याचा आरोप ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. यामुळे अजित पवारांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही संजय राऊत यांनी केली. याबाबत आज पत्रकारांनी अजित पवारांना विचारले असता, मी कशाला घोटाळा करेन. आपण पहिल्यांदा अर्ज मागवलेले होते. त्यावेळेस वेळ कमी होता. अनेकांनी अर्ज भरले. निकषाबाहेर असणाऱ्यांनीही अर्ज भरल्याचे आता ते सर्व लक्षात येत आहे. जसे लक्षात येईल, तसे लाभार्थी कमी केले जात आहेत, असे स्पष्टीकरण अजित पवार यांनी दिले.

पालकंत्रीपदाबाबत काळजी करू नका

रायगड पालकमंत्रीपदाच्या वादाबाबत अजित पवारांना विचारले असता, ते म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी आजच रायगड पालकमंत्रीपदाबाबत महत्त्वाची प्रतिक्रिया दिली आहे. पालकमंत्री असो किंवा नसो, त्या जिल्ह्यांच्या कामकाजांवर कुठे परिणाम झालाय का? नाही झालाय. त्यामुळे आपण काळजी करू नका. राज्याच्या प्रमुखांनी सांगितले आहे.

कागदावर पाच ब्रास वाळू जमिनीवर एक घमेला नाही!

घरकुल लाभार्थ्यांच्या मोफत वाळू स्वप्नाला प्रतीक्षेची किनार

मोहोळ । प्रतिनिधी

मोफत वाळू मिळणार, म्हणून घरकुल बांधणाऱ्यांच्या डोळ्यांत उमेद जागली. शासनाच्या निर्णयाने आशा पल्लवित झाल्या, पण प्रत्यक्षात घरकुल लाभार्थ्यांच्या हातात अजूनही एक ब्रास वाळू पडलेली नाही. मोहोळ तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजना व अन्य योजनांअंतर्गत मोठ्या प्रमाणावर घरकुलांचे काम सुरू असतानाच शासनाच्या वाळू धोरणाची अंमलबजावणी फक्त फाईल पुरती मर्यादित राहिली आहे.



वास्तविक, नव्या धोरणानुसार लाभार्थ्यांसाठी पाच ब्रास वाळू मोफत तर इतर स्थानिक लाभार्थ्यांसाठी प्रती ब्रास ६०० रुपये आकारून वाळू देण्याचे निर्देश आहेत. मात्र, मलिकपेठ, घाटणे, पासलेवाडी, बिटले, मुंढेवाडी आदी गावांतील वाळू स्त्रोत असूनही घरकुलांसाठी स्वतंत्र वाळू गट निश्चित न झाल्याने वितरणच ठप्प झाले आहे.

तालुकास्तरीय समितीने वाळू गट निश्चित करून त्यातील १० टक्के वाळू गट घरकुलासाठी राखीव ठेवायचे आहेत. पण हे नियोजन केवळ कागदावर आहे. पावसाळा उंबरठ्यावर असताना कामे रखडली, आणि लाभार्थ्यांची चिंता वाढली आहे.

आतापर्यंत एकाही लाभार्थ्याला वाळू मिळालेली नसल्यामुळे नाराजीचा सूर उमटू लागला आहे. काही सामाजिक संघटनांनी आंदोलनाचा इशारा देत शासनाला जागं करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. शासन निर्णय आहे, वाळूही आहे पण नियोजन आणि इच्छाशक्तीच्या अभावामुळे पाच ब्रास वाळू' ही फक्त घोषणा बनून राहिली आहे!

वळणाचा अंदाज चुकला आणि दोन दुचाकी समोरासमोर धडकल्या-दोघे गंभीर जखमी

पिशोर । जावेद शेख

कन्नड तालुक्यातील अंजना पळशी मध्यम प्रकल्पाजवळील वळणावर सोमवारी (दि. २ जून) दुपारी चार वाजताच्या सुमारास दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक होऊन झालेल्या अपघातात दोघेजण गंभीर जखमी झाले, तर एक १२ वर्षांची मुलगी थोडक्यात बचावली.या अपघातात नवनाथ मुरलीधर खिल्लरे (वय ४०, रा. जानेफळवाडी) आणि कालेखा लालेखा पठाण (वय ४०, रा. जंजाळा) हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. कालेखा पठाण हे आपल्या १२ वर्षांच्या मुलीसोबत युनिकॉर्न मोटारसायकल (क्र. एमएच ०४ डीझेड ८४९०) वरून कुंजखेडा येथून कन्नड-सिल्लोड मार्गे जात होते. त्याचवेळी नवनाथ खिल्लरे हे हिरो होंडा पॅशन (क्र. एमएच २० बीजे ७२४९) मोटारसायकलवरून सिल्लोड मार्गे कन्नडकडे येत होते.




अंजना पळशी प्रकल्पाजवळील वळणाचा अंदाज न आल्याने दोन्ही दुचाकींची समोरासमोर जोराची धडक झाली. या धडकेत दोघे दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले, तर कालेखा पठाण यांची मुलगी रस्त्याच्या बाजूला पडल्याने तिला किरकोळ जखमा झाल्या.घटनेची माहिती मिळताच पिशोर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे, पोलीस उपनिरीक्षक विश्वजित फडताळे, बिट जमादार वसंत पाटील व परमेश्वर दराडे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमींना पिशोर ग्रामीण रुग्णालयात हलवले. तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. पठाण यांनी प्राथमिक उपचार करून दोघा जखमींना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात पाठवले.

या अपघाताची नोंद पिशोर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

माळशिरस तालुक्यात घरकुल योजनेत फसवणूक; एका कुटुंबाला दोनदा लाभ-खरे गरजू वंचित

माळशिरस । प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील नेवरे गावात घरकुल योजनेत मोठ्या प्रमाणावर फसवणुकीचे प्रकार समोर आले आहेत. एका कुटुंबाला दोनदा घरकुल योजनेचा लाभ देण्यात आल्याचे निष्पन्न झाले असून यामुळे खऱ्या गरजू लोकांना योजना लाभत नाहीत, अशी तक्रार गावकऱ्यांकडून करण्यात येत आहे.



घरकुल योजना गरजू लोकांना त्यांच्या स्वप्नातील घर मिळवून देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने राबवलेली महत्वाकांक्षी योजना आहे. यामध्ये पंतप्रधान आवास योजना, इंदिरा आवास योजना, रमाई आवास योजना यांचा समावेश आहे. मात्र नेवरे गावात या योजनेचा गैरवापर होत असल्याचे समोर आले आहे. काही कुटुंबांना नियम मोडून दोनदा घरकुल लाभ देण्यात आला आहे, तर काही जण घरकुल मिळवण्यासाठी चुकीच्या माहितीचा वापर करत असल्याचेही लोकांच्या तक्रारीत म्हटले आहे.

घरकुल योजनेत प्रत्येक कुटुंबाला फक्त एकच घर देणे हा नियम आहे. यासाठी रेशनकार्ड, जमीन ७/१२ उतारा, कुटुंबातील इतर सदस्यांची यादी, बांधकामाची प्रत्यक्ष पाहणी अशा निकषांची तपासणी करूनच लाभ मंजूर केला जातो. मात्र नेवरे ग्रामपंचायतीकडून हे नियम कणखरपणे पाळले जात नाहीत. सरकारी नोकरीत असणाऱ्या, पेन्शनधारक, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य व शिपाई यांना प्राथमिकता देत नियम मोडले जात असल्याचा आरोप आहे.काही लाभार्थ्यांनी घरकुल योजनेचा लाभ घेतल्यानंतर पूर्ण बांधकाम न करता आर्थिक मदत मिळवली आहे. तसेच काही जण घरकुलासाठी कच्च्या घरांची नावे दाखवून लाभ मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. ही सर्व घटना गावकऱ्यांतून जोरदार चर्चिला जात आहे.

नेवरे गावातील नागरिकांनी ग्रामपंचायत तसेच पंचायत समितीकडे अनेक तक्रारी केल्या, पण त्यांना कोणतीही योग्य कारवाई होत नाही, असा आरोप आहे. तक्रार करणाऱ्यांवर दबाव टाकण्याचा प्रयत्नही होतो, ज्यामुळे लोक तक्रार करण्यास घाबरतात. त्यामुळे भ्रष्टाचार वाढत असून खऱ्या गरजू लोकांचा सरकारने ठरवलेला फायदा दडपला जात आहे.

या प्रकारामुळे गावकऱ्यांमध्ये संताप आहे. नियम मोडणाऱ्या ग्रामपंचायतीविरुद्ध योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे. ग्रामपंचायतीवर योग्य तपासणी करून दोषींवर कठोर कार्यवाही होणे गरजेचे आहे, असा लोकांचा ठाम दाब आहे.

अजित पवारांना मोठा धक्का..?

नागालँडमध्ये राजकीय भूकंप, राष्ट्रवादी काँग्रेसचे सातही आमदार एनडीडीपी पक्षात समावेश

मुंबई । विराम पवार

नागालँडमधील राजकारणात शनिवारी मोठी घडामोड झाली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व सात आमदार सत्ताधारी नॅशनलिस्ट डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पार्टी (एनडीडीपी) मध्ये सामील झाले. या विलीनीकरणामुळे मुख्यमंत्री नेफ्यू रिओ यांच्या नेतृत्वाखालील एनडीपीपीला राज्याच्या ६० सदस्यीय विधानसभेत स्पष्ट बहुमत मिळाले आहे.

या घडामोडीनंतर एनडीपीपीचे आमदार २५ वरून ३२ वर गेले आहेत. विधानसभेचे अध्यक्ष शारिंगैन लोंगकुमेर यांनी या विलीनीकरणाला मंजुरी दिली असून, संविधानाच्या दहाव्या अनुसूचीनुसार हा निर्णय वैध मानण्यात आला आहे. सर्व सात आमदारांनी स्वतः उपस्थित राहून लेखी सहमती दिली होती.गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने १२ जागा जिंकून राज्यात तिसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून स्थान मिळवले होते. मात्र, शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील गटात फूट पडल्यामुळे नागालँड युनिटने अजित पवार गटाला पाठिंबा जाहीर केला होता.

विधानसभा अध्यक्षांनी अधिकृत आदेश काढून विलीनीकरण नोंदवले असून, सचिवालयाला पक्ष संलग्नतेची नोंद अद्यतनित करण्याचे निर्देश दिले आहेत.राज्य सरकारचे प्रवक्ते आणि राज्यमंत्री के. जी. केन्ये यांनी पत्रकार



परिषदेत सांगितले, आज संध्याकाळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सातही आमदारांनी विलीनीकरण पत्र सादर केले. अध्यक्षांनी ते पत्र स्वीकारून विलीनीकरण मान्य केले आहे.

या निर्णयामुळे राज्यातील सत्ताधारी गट अधिक बळकट झाला असून, एनडीपीपी आणि भाजपची एकत्रित ताकद ४४ वर पोहोचली आहे. सध्या विधानसभेत ३२ एनडीपीपी, १२ भाजप, ५ NPP, प्रत्येकी २ आमदार असलेले LJP (रामविलास), नागा पीपल्स फ्रंट आणि RPI (आठवले), १ JD(U) आणि ४ अपक्ष सदस्य आहेत.दुसरीकडे, या विलीनीकरणामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अस्वस्थता पसरली आहे. ०पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते बृजमोहन श्रीवास्तव यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले, हे विलीनीकरण जनादेशाचा अवमान आहे आणि आम्ही याला विरोध करू. आम्ही कायदेशीर मार्गाने आणि पक्षांतर्गत बंदी कायद्याच्या आधारे आमची भूमिका स्पष्ट करू. लवकरच संबंधित आमदारांशी संवाद साधण्यात येईल.

मी विनंती करतो की वाद चव्हाट्यावर येऊ नये:मुख्यमंत्री गुंता सोडवतील;पालकमंत्री पदाच्या मुद्द्यावर बावनकुळेंचे आवाहन

नागपूर (वृत्तसंस्था)–भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर येथे बोलताना कार्यकर्त्यांना आवाहन केले आहे. महायुतीमध्ये सर्व आलबेल राहील याची जबाबदारी भाजपची जास्त आहे. यासाठी मी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढाकार घेत आहोत, की महायुतीत कुठे ठिणगी पडू नये. पालकमंत्री पदाचा तिढा लवकर सुटेल अशी व्यवस्था मुख्यमंत्र्यांनी केली असून तो गुंता ते सोडवतील, असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, रायगडमधील तिन्ही पक्षातील नेत्यांना,कार्यकर्त्यांना भाजप प्रदेशाध्यक्ष म्हणून मी विनंती करतो की वाद चव्हाट्यावर नेऊ नये. त्यांनी आपापल्या नेत्यांसोबत बसून वाद सोडवावे, जाहीर वक्तव्य करणे योग्य नाही. रस्त्यावर वाद न होता आपापल्या नेतृत्वासमोर वाद सोडवले पाहिजे, असे आवाहन बावनकुळे यांनी केले आहे.पुढे बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, आम्ही ८० जिल्हाध्यक्ष नेमले आहेत. १२३२ तालुकाध्यक्ष नेमले आहेत. १ लाख बूथ समित्या नेमल्या आहेत. लवकरच प्रदेशाध्यक्ष संदर्भातला निर्णय होईल. उद्या जरी निवडणुका आल्या तरी भाजप आणि महायुती तयार आहे. तसेच ऑक्टोबर पर्यंत निवडणुका घ्याव्या लागणार आहेत. राज्य सरकार निवडणूक आयोगाला त्यासाठी सर्व संसाधन देत आहे. निवडणुका लवकर झाल्या पाहिजे, कारण खालच्या कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता आहे. १३००० पदांसाठीची ही निवडणूक असणार आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात १३००० नवीन नेतृत्व तयार होईल.


कासारे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी माधुरी खैरनार यांची बिनविरोध निवड

बिनविरोध निवडीनंतर ग्रामस्थांत आनंदोत्सव; महिलाराजाचे नवे पर्व सुरू

धुळे । उमाकांत अहिरराव

साक्री तालुक्यातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या कासारे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी माधुरी विजय खैरनार यांची बिनविरोध निवड झाली आहे. उपसरपंच भारती पवार यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने रिक्त झालेल्या पदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली होती. या निवडीत माधुरी खैरनार यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.उपसरपंच निवडीसाठी सरपंच सुवर्णा देसले यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत अधिकारी गीता बैरागी यांच्या मार्गदर्शनाखाली सभा आयोजित करण्यात आली होती. परिवर्तन पॅनेलचे गटनेते प्राचार्य विकास देसले यांच्या नेतृत्वाखाली माधुरी खैरनार यांनी अर्ज दाखल केला होता, तर विरोधी पॅनलतर्फे कोणताही अर्ज न आल्याने निवड बिनविरोध ठरली.

निवडीनंतर गावात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या सभेला माजी जिल्हा परिषद सदस्य उत्तमराव देसले, मोहनशेठ जैन, माजी सरपंच सतीश देसले, माजी जि.प. सदस्य गोकुळ परदेशी, प्राचार्य विकास देसले, माजी तंटामुक्त अध्यक्ष उल्हास देसले, रावसाहेब खैरनार, डॉ. महेंद्र खैरनार, प्रमोद खैरनार, मनोहर जाधव, संजय पवार, अविनाश खैरनार, तसेच ग्रामपंचायत सदस्य देविदास देसले, उल्केश देसले, राहुल देसले, नफीस शहा, आबा पवार, सुवर्णा पवार, लताबाई जगताप, सुरेखा जाधव, लीना भावसार, अलका गवळे, राहुल बागूल, भटू जगताप यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.निवडीनंतर माधुरी खैरनार यांचा गटनेते प्राचार्य विकास देसले, उत्तमराव देसले, गोकुळ परदेशी, सतीश देसले आदी मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. त्यांच्या निवडीमुळे ग्रामपंचायतीत महिलांचा प्रभाव अधिक बळकट झाल्याचे दिसून येत आहे.



साक्री तालुक्यातील सर्वात मोठ्या ग्राम पंचायतीच्या उपसरपंचपदी विराजमान होण्याचा बहुमान मिळाला. माझ्या बिनविरोध निवडी बाबत गटनेते व सर्व पदाधिकाऱ्यांनी दाखवलेल्या विश्वासा बद्दल मी आभार मानते. ग्रामस्थांच्या सेवेसाठी पूर्ण समर्पणाने कार्यरत राहीन, असे निवडी नंतर माधुरी खैरनार यांनी सांगितले.

वेतनश्रेणीसाठीचे प्रशिक्षण तांत्रिक अडचणीत; शिक्षकांची चिंता वाढली

नोंदणीसाठी २ हजार रुपये भरूनही चाचणी व उपस्थिती अडचणीत; प्रमाणपत्राबाबत प्रश्नचिन्ह

सोलापूर । प्रतिनिधी

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT), पुणे यांच्यावतीने संपूर्ण राज्यात २ ते १२ जून २०२५ या कालावधीत वरिष्ठ वेतनश्रेणी व निवड वेतनश्रेणी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व आश्रमशाळांतील हजारो शिक्षक हे प्रशिक्षण घेत असून, पहिल्याच दिवशी ऑनलाईन उपस्थिती व चाचणीदरम्यान उद्भवलेल्या तांत्रिक अडचणींमुळे शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



शिक्षकांनी नियम पाळून, वेळेवर शुल्क भरून प्रशिक्षणात सहभाग घेतला आहे. प्रणालीतील त्रुटींमुळे त्यांचे नुकसान होणे अन्यायकारक ठरेल. शासनाने तातडीने तांत्रिक उपाययोजना करून शिक्षकांना दिलासा द्यावा,असे मत विजयकुमार गुंड, जिल्हा प्रवक्ता, शिक्षक भारती सोलापूर यांनी व्यक्त केले.

शिक्षकांनी सेवेत १२ व २४ वर्षे पूर्ण करून पात्रतेनुसार SCERT पुणे यांच्याकडे ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करत दोन हजार रुपये शुल्क भरले आहे. हे प्रशिक्षण पूर्ण करून मिळणारे प्रमाणपत्र ही पुढील वेतनश्रेणीसाठी अनिवार्य अट आहे. मात्र, प्रशिक्षणाचा पहिलाच दिवस शिक्षकांसाठी धक्का देणारा ठरला.

ऑनलाईन चाचणी करताना सर्व्हर डाऊन होणे, मोबाईलवर लिंक न उघडणे, चाचणी अर्धवट थांबणे, 'टॉपिक आयडी' न जनरेट होणे अशा अनेक तांत्रिक अडचणी समोर आल्या. काही शिक्षकांना प्रयत्न करूनही चाचणी पूर्ण करता आली नाही. त्यामुळे, शुल्क भरूनही आम्ही अडकतोय, आता प्रमाणपत्र मिळेल का? असा प्रश्न शिक्षक विचारू लागले आहेत.या अडचणींचा थेट परिणाम त्यांच्या वेतनश्रेणीवर होण्याची शक्यता असल्याने शिक्षकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. प्रशिक्षणाचा कालावधी १२ जूनपर्यंत असून, शिक्षकांनी शासनाकडे तांत्रिक अडथळे दूर करण्याची मागणी केली आहे.

राज्यातील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेला आणि पगार बंदीला शासनाची तूर्त स्थगिती

चिमूर । शेषराव राऊत

राज्यातील सर्व अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेला शासनाने तूर्त स्थगिती दिली आहे. जिल्हा परिषदेच्या संदर्भात न्यायालयीन आदेश असूनही सुरू असलेली समायोजन प्रक्रिया आता थांबवण्यात आली आहे. यासोबतच समायोजनास नकार दिलेल्या अतिरिक्त शिक्षकांचे पगारही बंद करण्यात आले होते, परंतु आता शिक्षण संचालकांनी संचमान्यता, समायोजन प्रक्रिया आणि पगार बंदीला स्थगिती देण्याचे स्पष्ट आदेश जारी केले आहेत. यामुळे अतिरिक्त शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला आहे.



शिक्षक भारतीचे अध्यक्ष अशोक बेलसरे, माजी आमदार कपिल पाटील आणि कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांनी शिक्षण मंत्री दादाजी भुसे, शिक्षण सचिव रणजितसिंह देओल यांची भेट घेऊन न्यायालयीन आदेशानंतरही समायोजन प्रक्रिया सुरू असल्याचे तसेच पगार थांबवण्यात आल्याचे निदर्शनास आणले. त्यांनी आरटीई कायदा आणि महाराष्ट्र राज्य सेवा शर्ती नियमावली १९८१ यांच्याशी विसंगत असल्याचे १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय असल्याचेही लक्षात आणून दिले.

यानंतर शासनाने संचमान्यता आणि समायोजन प्रक्रिया थांबवल्याचे जाहीर केले आहे. शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी सांगितले की हा आदेश मुंबईसह संपूर्ण राज्यावर लागू आहे. त्यामुळे शेकडो शिक्षकांचे पगार बंदीचे संकट तात्पुरते दूर झाले आहे.शिक्षक भारती नागपूर विभागीय अध्यक्ष सुरेश डांगे यांच्या मते, आज शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत समायोजनाची संपूर्ण प्रक्रिया थांबवण्यात आल्याचे सांगण्यात आले. कोर्टाच्या निर्णयाची अवमानना होणार नाही यासाठी आदेश जारी करण्यात आले आहेत. तसेच, मुंबईतील शिक्षकांना मुंबईच्या बाहेर अतिरिक्त नेण्याची आणि वेतन स्थगितीची प्रक्रिया देखील तूर्त थांबवली जाणार असल्याचे पालकर यांनी स्पष्ट केले.याबाबत शिक्षक भारतीचे कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांनी शिक्षण मंत्री, सचिव आणि संचालक यांचे आभार मानले आहेत.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती शिवूरमध्ये साजरी



वैजापूर । अर्जुन शिंदे

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्ताने शिवूर येथील संत शंकर स्वामी मंगल कार्यालयात एक विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या शेतीविषयक धोरण आणि शासन व्यवस्थेवर सखोल मार्गदर्शन देण्यात आले.


यावेळी उदय देवळाणकर यांनी शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आणि मार्गदर्शक टिप्स दिल्या. या व्याख्यानाला जिल्हा अध्यक्ष एकनाथराव जाधव, वैजापूर नगराध्यक्ष दिनेश परदेशी, बाजार समिती संचालक ज्ञानेश्वर जगताप, जिल्हा पदाधिकारी सुनील पैठणपगारे, तसेच अनेक नामांकित सामाजिक आणि शेतकरी नेते उपस्थित होते.शिवाय गोरख घायवट, मंजाहरी गाढे, कल्पनाताई पवार, अशोक जाधव, नारायण तुपे, प्रकाश भोपळे, रामेश्वर जाधव, केतन आव्हाळे, उदय सोनवणे, अशोक शेळके, श्रावण नळे, ज्ञानेश्वर मतसागर, देविदास मतसागर, प्रमोद गुळे, नानासाहेब सुर्येवंशी, शिवाजी गोरे, शिवाजी राजे साळुंखे, आकाश बागुल, विपीन साळे, योगेश घायवट, ज्ञानेस्वर कदम, दीपक गाजरे, प्रकाश तुपे, अंकुश वर्पे, दत्तू हिरे, संदेश जाधव, अमोल जाधव, विशाल लकवाल, दिलीप जाधव, माणिक मोरे, भावलाल जगधने यांसह शेतकरी व समाजातील मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग घेतला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन अमोल अशोकराव जाधव यांनी केले.या कार्यक्रमातून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कर्तृत्वाची आणि त्यांच्या धोरणांची आठवण कायम ठेवण्याचा संकल्प शेतकरी व समाजाने घेतला.

शेतकऱ्यांना पीक कर्ज वेळेवर उपलब्ध करून द्या हपालकमंत्री डॉ.अशोक उईके यांचे बँकांना निर्देश


हदोन महिन्यात जिल्ह्यात ६८ टक्के पीक कर्ज वाटप

चंद्रपूर । प्रतिनिधी

खरीप हंगामाच्या तयारीत शेतकरी गुंतला असून त्याने शेतीची कामे सुरू केली आहे. हा हंगाम शेतक-यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. बि-बियाणे, खते, किटकनाशके आदी कृषी निविष्ठा घेण्यासाठी शेतक-यांना आज पीक कर्जाची आवश्यकता आहे. त्यामुळे शेतक-यांना वेळेवर पीक कर्ज मिळेल, या दृष्टीने सर्व बँकांनी योग्य नियोजन करावे, पीक कर्जाबाबत शेतकऱ्यांची कुठलीही तक्रार येता कामा नये, असे निर्देश राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालय येथे खरीप हंगाम पीक कर्जवाटपाबाबत बँकांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राजू नंदनवार, नाबार्डचे महाव्यवस्थापक तृणाल फुलझेले, जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) चंद्रशेखर बोधड, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार, प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांच्यासह



बँकेचे प्रतिनिधी उपस्थित होते.जिल्ह्यात खरीप हंगामाकरीता ११५० कोटी आणि रब्बी हंगामाकरीता १०० कोटी असे एकूण १२५० कोटी पीक कर्जवाटपाचे उद्दिष्ट आहे, असे सांगून पालकमंत्री डॉ. उईके म्हणाले, शेतकरी हंगामाच्या तयारीला लागला आहे. राष्ट्रीयकृत बँकांकडून शेतक-यांना वेळेवर पीक कर्ज न देण्याचे प्रमाण जास्त आहे, तशा तक्रारी दरवर्षी प्राप्त होतात. या वर्षी कोणतीही तक्रार येऊ देऊ नका. अतिशय संवेदनशीलपणे आणि सकारात्मकतेने शेतक-यांना पीक कर्ज वेळेवर उपलब्ध करून द्या.पीक कर्जापासून कोणताही पात्र शेतकरी वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. महत्वाचे म्हणजे शेतकरी व इतर पात्र लाभार्थ्यांना केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळत असतो. डीबीटीच्या माध्यमातून या योजनांचा निधी शेतक-यांच्या खात्यात जमा होतो. योजनांच्या निधीतून पीक कर्जाची रक्कम बँकांनी कपात करू नये, असे निर्देशही पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी दिले.यावेळी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राजू नंदनवार यांनी सादरीकरण केले. जिल्ह्यात खरीप हंगामाचे उद्दिष्ट ११५० कोटी रुपयांचे असून आतापर्यंत ७१०३३ शेतक-यांना ७७६ कोटी ५७ लक्ष रुपयांचे पीक कर्जवाटप करण्यात आले आहे. ही टक्केवारी ६८ आहे. यात सर्वाधिक वाटा चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा असून सहकारी बँकेने ६३३६३ शेतक-यांना ६८५ कोटी ८८ लक्ष रुपयांचे पीक कर्ज वाटप केले आहे.



मानवतेचा संदेश देत जीतेंद्र गाडगे यांनी परत केला हरवलेला मोबाईल

नागपूरमध्ये वाढदिवसाच्या कार्यक्रमात सापडलेला मोबाईल परत करत गाडगे कुटुंबीयांचा उमटवला आदर्श

चिमूर । प्रतिनिधी

चिमूर तालुक्यातील नेरीजवळील उसेगाव येथील रहिवासी जीतेंद्र गाडगे यांनी प्रामाणिकपणाचा आणि मानवतेचा आदर्श ठेवत नागपूर येथील एका वाढदिवसाच्या कार्यक्रमात सापडलेला महागडा मोबाईल शोधून त्याच्या मूळ मालकाला परत केला. त्यांच्या या कृतीमुळे गाडगे कुटुंबीयांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

२४ मे रोजी नागपूरमधील खामला येथील अर्जुना सेलेब्रेशन हॉलमध्ये आशीष नगरकर यांच्या मुलाचा वाढदिवस सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला जीतेंद्र गाडगे आपल्या कुटुंबासह उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान गाडगे यांचा मुलगा हिमांशु गाडगे याला एका खुर्चीवर बंद स्थितीत असलेला मोबाईल सापडला.



मोबाईल मालकाचा शोध घेतला असता लगेच कोणतीच माहिती उपलब्ध झाली नाही. मात्र दुसऱ्या दिवशी २५ मे रोजी मोबाईल चार्जिंगला लावून सुरू केल्यावर अमोल बारसागडे नामक व्यक्तीचा फोन आला. त्यावेळी कळले की मोबाईल बारसागडे यांचा असून तेही त्या कार्यक्रमाला उपस्थित होते, परंतु मोबाईल बंद असल्यामुळे तो हरवलेला लक्षात आले नव्हते.यात विशेष म्हणजे ३१ मे रोजी आशीष नगरकर चिमूर तालुक्यातील शिवरा येथे एका लग्न समारंभासाठी आले असता, त्यांच्या माध्यमातून जीतेंद्र गाडगे यांनी सदर मोबाईल बारसागडे यांच्यापर्यंत पोहोचवला.गाडगे कुटुंबीयांच्या या प्रामाणिकतेमुळे बारसागडे कुटुंबाने त्यांचे मन:पूर्वक आभार मानले. यासोबतच त्यांच्या या कृतीमुळे हरवलेली वस्तू परत मिळवण्याची आशा अजूनही जिवंत आहे, असा संदेश समाजात गेला.

तुकूम येथे भीषण अपघात; आ.किशोर जोरगेवार यांची घटनास्थळी पाहणी

तुकूम । प्रतिनिधी

हायवा चालकाला फिट आल्याने त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे वाहनाने रस्त्याकडेला असलेल्या नागरिकांना चिरडले. या दुर्घटनेत एकाचा मृत्यू झाला असून काही नागरिक जखमी झाले आहेत. सानिका कुमरे (वय २२ वर्षे, रा. लक्कडकोट) असे मृत विद्यार्थिनीचे नाव आहे. ही घटना तुकूम येथे घडली असून, आमदार किशोर जोरगेवार यांनी घटनास्थळी जाऊन घटनेची माहिती घेतली. तसेच रुग्णालयात उपचार घेत असलेल्या काजल आश्राम हिची आमदार किशोर जोरगेवार यांनी भेट घेतली.

मिळालेल्या माहितीनुसार, सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास हायवा चालक तुकूम परिसरातून जात असताना, चालकाला फिटचा झटका आल्याने त्याचे वाहनावरील नियंत्रण



सुटले. वाहनाने रस्त्यालगत उभ्या असलेल्या नागरिकांना आणि ऑटोला चिरडले. या घटनेत सानिकाचा जागीच मृत्यू झाला, तर इतर नागरिक जखमी झाले आहेत. यात नंदा उंबरकर (वय ५५, रा. मेजर गेट,) या किरकोड जखमी झाल्या आहेत. तसेच काजल आश्राम (रा. उपरवाही, ता. राजुरा) हिला जास्त इजा झाल्याने तिला खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.घटनेची माहिती मिळताच आमदार किशोर जोरगेवार यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची माहिती घेतली. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी सुधाकर यादव यांची उपस्थिती होती. त्यानंतर आमदार किशोर जोरगेवार यांनी खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार घेत असलेल्या काजल मेश्राम हिची भेट घेतली आणि सुरु असलेल्या उपचाराबाबत डॉक्टरांकडून माहिती घेतली. मृतक आणि जखमी या दोघीही मैत्रीनी असुन त्या पोलिस भरतीच्या तयारी करिता चंद्रपूरात राहत हांत्या. त्या एका खाजगी अभ्यासिकेत अभ्यास करुन घरी जात असतांना सदर घटना घडली आहे.

घरफोडी करणारे धूर्त चोर पती-पत्नी अटकेत; पोलीस निरीक्षक अजय आकरे यांच्या नेतृत्वात तीन घरफोड्यांचा यशस्वी उलगडा

धामणगाव रेल्वे । प्रशांत मुन

चांदूर रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या तीन घरफोड्यांचा छडा लावत अवघ्या काही दिवसांत धाडसी कारवाईत चोरट्या पती-पत्नीला अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. या यशस्वी कारवाईचे श्रेय पोलीस निरीक्षक अजय आकरे यांच्या कुशल नेतृत्वाला जाते. आरोपींकडून सुमारे ३ लाख ६ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, या कारवाईने परिसरात पोलिसांविषयी विश्वास अधिकच दृढ झाला आहे.२१ मे २०२४ रोजी गुन्हा क्रमांक ८५/२५, कलम ३०५, ३३१ (३) भादंवि अंतर्गत एका घरफोडीची नोंद करण्यात आली होती. या गुन्ह्याचा तपास अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करत अजय आकरे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने अमरावती येथील सीमा उर्फ हेमा परवीन शेख नसीम व तिचा पती शेख नसीम शेख सलीम यांना अटक केली. यासोबतच प्रफुल्ल सुधाकरराव पाठक (रा. सराफा बाजार, अमरावती) यालाही ताब्यात घेण्यात आले.

सखोल चौकशीत आरोपी पती-पत्नीने चांदूर रेल्वे हद्दीत घडलेल्या आणखी दोन घरफोड्यांची कबुली दिली. संबंधित प्रकरणांमध्ये गुन्हा क्रमांक ४१/२५ व ७८१/२४ या गुन्ह्यांचा समावेश आहे. पोलिसांनी मिळून ८३ ग्रॅम सोनं, ८३ ग्रॅम चांदी व रोख रक्कम असा एकूण ३,०६,८०० रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.ही कारवाई ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अतिरिक्त पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, व उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. विशेषतः पोलीस निरीक्षक अजय आकरे यांनी आपल्या अनुभव, धाडस आणि तांत्रिक तपासकौशल्याच्या बळावर संपूर्ण तपास प्रभावीपणे हाताळला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक शरद आहेर, सुयोग महापुरे, नंदलाल लिंगोट, प्रशांत ढोके व प्रदीप पाटील यांनीही अथक परिश्रम घेतले.या कामगिरीमुळे अजय आकरे व त्यांच्या पथकाचे कौतुक होत असून, अजूनही काही गुन्ह्यांचा उलगडा होण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.पोलीस निरीक्षक अजय आकरे हे नागरिकांच्या सुरक्षेसाठी खऱ्या अर्थाने सावध आणि सजग प्रहरी ठरत आहेत.



विदर्भातील मातृशक्तींसाठी चार दिवसीय प्रशिक्षण वर्ग यशस्वीरीत्या पूर्ण

वर्धा । प्रतिनिधी

विश्व हिंदू परिषद मातृशक्तीचा चार दिवसीय अभ्यास वर्ग वर्धा येथील मुंडले सांस्कृतिक सभागृहात २९ मेपासून सुरू झाला होता. १ जून रोजी समारोप सत्र संतांच्या पवित्र उपस्थितीत अत्यंत उत्साही वातावरणात पार पडले.या अभ्यास वर्गात विदर्भातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या सुमारे १४० मातृशक्तींनी सहभाग घेतला. प्रशिक्षण सत्रात इतिहासकार विनायकराव देशपांडे, विहिंपचे क्षेत्रीय मंत्री गोविंदजी शेंडे, विदर्भ प्रांत मंत्री प्रशांतजी तितरे, प्रांत संघटन मंत्री विष्णुजी देशमुख आणि विदर्भ प्रांत मातृशक्ती संयोजिका कांचनताई ठाकरे यांचे मार्गदर्शन लाभले.



१ जून रोजी पार पडलेल्या समारोपीय सत्रात प्रमुख वक्त्या म्हणून मा. डॉ. प्रतिभाताई बोथारे (मुंबई - क्षेत्रीय मातृशक्ती संयोजिका) उपस्थित होत्या. यावेळी पू. साध्वी माता भूमा भारती आणि पू. साध्वी सीमा दीदी (दत्तात्रेय आश्रम) यांचेही आशीर्वचन लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रतिवेदन कांचनताई ठाकरे (विदर्भ प्रांत मातृशक्ती संयोजिका) यांनी सादर केले. संचालन डॉ. सीमाताई पांढरकर (प्रांत सहसंयोजिका) यांनी केले.

व्यासपीठावर विभाग संयोजिका अनुराधाताई महाकाळकर यांच्यासह वर्धा शहरातील काही मान्यवर प्रबुद्ध महिला विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होत्या. यामध्ये वंदनाताई भुते, ॲड. दिपाली पोलाड, ॲड. योजना ढोक,बेलदार, प्रा. साधना बल्लाळ, प्रा. प्रीती खाडे आणि शारदा केने यांचा समावेश होता.

यवतमाळ विभागातील विश्व हिंदू परिषद पदाधिकारी, विदर्भ प्रांत सेवा प्रमुख राम लोखंडे, विभाग मंत्री प्रदीपजी खराटे आणि चावलाजी यांनी अभ्यास वर्गाला विशेष भेट दिली.या अभ्यास वर्गाच्या यशस्वी आयोजनासाठी वर्धा जिल्ह्यातील विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, मातृशक्ती आणि दुर्गावहिनीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली.

गोहत्या प्रतिबंधक कायद्याच्या कठोर अंमल-बजावणीसाठी वर्धा जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

गोमाता रक्षणासाठी संघटनांचे एकत्रित पाऊल

वर्धा । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने लागू केलेला गोहत्या प्रतिबंधक कायदा असूनही अनेक ठिकाणी त्याचे उल्लंघन होत असल्याच्या पार्श्वभूमीवर अखिल आर्यवर्त संघ, आंतरराष्ट्रीय बजरंग दल आणि आंतरराष्ट्रीय दुर्गाशक्ती परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी वर्धा यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले. सण-उत्सवांच्या निमित्ताने काही समुदायांकडून जाणीवपूर्वक गोहत्यांचे प्रमाण वाढवले जात असून, यामुळे भारतातील शेती, दुग्धउत्पादन, अर्थव्यवस्था आणि गोवंशसंख्या यावर विपरीत परिणाम होत आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले. या निवेदनात गोहत्या प्रतिबंधक कायद्याची प्रभावी आणि कठोर अंमलबजावणी करावी, गोमांस विक्री करणाऱ्यांवर कारवाई करावी, शेतकरी व नागरिकांनी गायी-बैलांची विक्री कसाईखान्यांना करू नये आणि जनजागृती मोहिमेद्वारे गोसंवर्धन सुनिश्चित करावे, अशा प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या. ही मोहीम अखिल आर्यवर्त संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष व संस्थापक धर्मवीर दिनेशजी पाटील यांच्या आदेशानुसार संपूर्ण भारतभर राबवण्यात येत असून, वर्ध्यातील निवेदन कार्यक्रमात संतोषसिंह ठाकुर (विदर्भ प्रांत अध्यक्ष - आंतरराष्ट्रीय बजरंग दल), शीतल राजसम्राट बघेल (विदर्भ प्रांत अध्यक्ष - दुर्गाशक्ती परिषद), शामजी देशपांडे (जिल्हा महामंत्री - अखिल आर्यवर्त संघ), रणजीत गौतम, गौरव पांडे, राजसम्राट बघेल, मोहनसिंह चंदेल, रमेशसिंह चंदेल, जोगिंदरलाल जायसवाल, जय डायरे, शिवम दुबे, दामिनी मेश्राम, वीर बजरंगी आणि इतर कार्यकर्ते उपस्थित होते. जय श्रीराम, जय गौमाता या घोषणांनी वातावरण गजरमय झाले होते. संपूर्ण देशभर या निवेदनाच्या प्रती पाठविण्यात येणार असून, लवकरच व्यापक जनजागृती अभियानही हाती घेण्यात येणार आहे.



कर्तव्यनिष्ठ अधिकारी नरेश पारधी वर्धा महावितरणच्या कार्यकारी अभियंतापदावर रुजू

वर्धा । प्रतिनिधी

महावितरणच्या वर्धा विभागीय कार्यालयात नरेश पारधी यांनी ३१ मे रोजी कार्यकारी अभियंता पदाचा कार्यभार स्वीकारला. यापूर्वी कार्यरत असलेले कार्यकारी अभियंता स्वप्नील गोतमारे यांची नागपूर येथे बदली झाल्यानंतर पारधी यांची वर्धा येथे नियुक्ती करण्यात आली आहे. नरेश पारधी हे यापूर्वी नागपूर येथे अतिरिक्त कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत होते. तसेच त्यांनी वर्धा शहरात अतिरिक्त कार्यकारी अभियंता आणि पिपरी मेघे येथील उपविभागीय कार्यालयात उपकार्यकारी अभियंता म्हणूनही प्रदीर्घ सेवा बजावली आहे.



ते एक कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आणि ग्राहकाभिमुख अधिकारी म्हणून ओळखले जातात. अखंड वीजपुरवठा, वीज हानी नियंत्रण, महसूल वाढवणे आणि ग्राहकांच्या तक्रारींचे त्वरित निवारण हे त्यांच्या कार्यशैलीतील प्रमुख घटक आहेत. त्यांच्या वर्धा बदलीचे स्वागत महावितरण कर्मचारी आणि ग्राहकांकडून मोठ्या आनंदाने होत आहे.

आर.के.परिवाराच्या वतीने संजय गाते यांचा सत्कार

वर्धा । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाच्या वर्धा जिल्हाध्यक्षपदी संजय गाते यांची नुकतीच निवड झाल्याबद्दल आर.के. परिवाराच्या वतीने त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. हा सत्कार आर.के. हायस्कूल ट्रस्टचे मुख्य समन्वयक नूरसिंग जाधव यांच्या हस्ते पार पडला. कार्यक्रमात आर.के. हायस्कूलचे उपमुख्याध्यापक गणेश शर्मा, जुनिअर कॉलेजचे उपप्राचार्य अजय कोयाळ, अंशतः अनुदानित विभागाचे प्रमुख प्रा. जितेंद्र वर्मा तसेच शिक्षकेतर कर्मचारी सतीश बावणे उपस्थित होते. गाते यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व मिठाई देऊन सत्कार करण्यात आला. आर.के. ट्रस्टचे अध्यक्ष श्रीहरीप्रकाशजी केजरीवाल (गया, बिहार) आणि आर.के. शाळा समितीचे अध्यक्ष रंजनकुमारजी केजरीवाल (राजकोट, गुजरात) यांनी देखील त्यांच्या निवडीबद्दल दूरद्वारे शुभेच्छा व अभिनंदन दिले.



संजय गाते हे आर.के. ज्युनियर कॉलेज चे कला शाखेचे माजी विद्यार्थी असून, आपल्या शिक्षणकाळातच त्यांनी आर.के. संस्थेचे नाव उज्वल केले आहे. नागपूर बोर्डातून राज्यशास्त्र विषयात प्रथम क्रमांक पटकावत त्यांनी आपल्या अभ्यासातील कुशाग्रता सिद्ध केली होती. आज ते राजकीय क्षेत्रातही ज्ञान, कर्तृत्व आणि नेतृत्वगुणांच्या बळावर यशस्वी वाटचाल करत आहेत. त्यांच्या या यशस्वी निवडीबद्दल आर.के. परिवाराने अभिनंदन करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

अनिल बेलोनकर यांचा सेवानिवृत्तीपूर्वक सन्मान-३६ वर्षांच्या समर्पित सेवेला सलाम

धामणगाव रेल्वे । प्रशांत मुन

धामणगाव रेल्वे नगर परिषदेच्या आरोग्य विभागात ३६ वर्षे २ महिने निष्ठेने सेवा बजावलेले वरिष्ठ कर्मचारी अनिल बेलोनकर यांचा शुक्रवार, ३० मे रोजी सेवानिवृत्तीचा दिवस आला. त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त नगर परिषदेमार्फत अटल बिहारी वाजपेयी सभागृहात एक साधा पण भावनात्मक सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

मुख्याधिकारी पूनम कळंबे यांच्या हस्ते बेलोनकर यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या सेवा कार्याचा गौरव करताना उपस्थितांनी त्यांच्या कर्तव्यनिष्ठा, शिस्तप्रिय वृत्ती आणि सहकाऱ्यांशी स्नेहपूर्ण वागणुकीचे विशेष कौतुक केले.



कार्यक्रमाला प्रशासकीय अधिकारी प्रतिभा डोंगरे, आरोग्य निरीक्षक आकाश सोनेकर, अक्षय ढोरे, रणजीत मार्वे, अशोक यादव, विनोद चावरे, रमन राय, शिक्षण अधिकारी उमेश गोंडिक, नगर अभियंता शेखर ढबाले, सहायक अभियंता प्रदीप सहारे, मोहन ठाकूर, कर निरीक्षक पंकज इंगळे, सहीदभाई, युनुसभाई, लेखापाल अविनाश भालेराव, सहायक लेखापाल विजय कोकाटे, पाणी पुरवठा विभागाचे प्रशांत रोकडे, संगणक अभियंता प्रशांत घूमनर, माजी नगरसेवक विनोद तलवारे, काशीनाथ काकडे, नरेंद्र चौधरी, पुष्पा गुडधे, नितीन इमले आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.या प्रसंगी बेलोनकर यांच्यासोबत त्यांच्या पत्नी सरिता बेलोनकर, पुत्र वैभव बेलोनकर आणि कन्या कल्याणी खनगडे उपस्थित होत्या. उपस्थित सर्वांनी त्यांच्या भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

पुण्यश्लोक अहिल्याबाई महिला सन्मान पुरस्कार सोहळा सन्मानपूर्वक होण्यासाठी मनसेच्या वतीने निवेदन सादर

वर्धा । प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला सन्मान पुरस्कार सोहळा योग्य आणि सन्माननीय पद्धतीने पार पडावा, यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, वर्धा यांना निवेदन सादर करण्यात आले.या निवेदन सादरीकरणाचा कार्यक्रम मनसे जिल्हाध्यक्ष शंकरभाऊ पोटफोडे, वर्धा शहर उपाध्यक्ष नितीन अमृतकर, वर्धा तालुका अध्यक्ष धमदिप हीवरकर यांच्या मार्गदर्शनात पार पडला. वर्धा तालुका संघटक नितीन परतेकी व शहर उपाध्यक्ष साहिल मानकर यांच्या नेतृत्वात हे निवेदन देण्यात आले. कार्यक्रमावेळी मनसे सर्कल अध्यक्ष शंकर वासनिक (बोरगाव मेघे), नीतेश टापरे, अक्षय सुखदेवे, प्रफुल ठाकरे, नितीन दाभेकर, सतीश चौधरी व इतर मनसे कार्यकर्ते उपस्थित होते.या निवेदनाच्या माध्यमातून, ग्रामपंचायतीमार्फत होणाऱ्या या पुरस्कार वितरण कार्यक्रमात महिलांचा योग्य सन्मान व्हावा, असा आग्रह व्यक्त करण्यात आला. मनसेने या उपक्रमाला सामाजिक जबाबदारी समजून पुढाकार घेतल्याबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.



महसूल पथकाची चिंचोली रेतीघाटावर कारवाई-मोठे तस्कर मात्र अजूनही मोकाट

धामणगाव रेल्वे । प्रशांत मुन

दि. ३१ मे रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास धामणगाव रेल्वे तालुक्यातील चिंचोली रेती घाटावर महसूल प्रशासनाने मोठी कारवाई केली. तहसीलदार अभय घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने अंदाजे १ लाख रुपयांच्या किमतीचे केनी यंत्र, दोरखंड आणि सुमारे ३० ब्रास रेती साठा जप्त केला. कारवाईची चाहूल लागताच तस्करांनी रिकामा ट्रॅक्टर शेतात टाकून पळ काढला.जप्त केलेला रेतीसाठा शासनाच्या धोरणानुसार घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाटप करण्यात येणार आहे. या कारवाईत मंडळ अधिकारी लाड, ग्राम महसूल अधिकारी सागर भांडवले, मस्के, मानकर, जयभये आदी अधिकारी सहभागी होते.याआधी, ३० मे रोजी महसूल आणि पोलिसांच्या संयुक्त पथकाने विटाळा रेती घाटावर मोठी मोहीम राबवून वर्धा नदीतून अवैधरीत्या वाहून आणलेले दोन तराफे जेसीबीच्या सहाय्याने नष्ट केले. कारवाई दरम्यान ठाणेदार इंगळे यांनी पोलिस पथक तत्काळ पाठवून महत्त्वाचे सहकार्य केले. तहसीलदार अभय घोरपडे यांनी जनतेला आवाहन केले आहे की, शासनाने घरकुल लाभार्थ्यांसाठी मोफत रेती वितरणाचे धोरण राबवले असून, विटाळा, चिंचोली, आष्टा व निंभोरा राज येथील अधिकृत रेतीघाटांवरून रेती वाटप सुरू आहे. इच्छुक लाभार्थ्यांनी आधार क्रमांक व घरकुल योजनेतील पात्रता क्रमांकासह तहसील कार्यालयात अर्ज करावा.सुधारित धोरणानुसार घरकुल योजनेबाहेरील इच्छुकांनी देखील तहसील कार्यालयाकडे रॉयल्टी भरून वरील घाटांवरून रेती घेण्याची सुविधा उपलब्ध आहे.तथापि, या सातत्याने होणाऱ्या कारवायांनंतरही मोठे रेती तस्कर मोकाटच असल्याची चर्चा नागरिकांमध्ये असून, प्रशासनाने अजून कठोर पावले उचलावीत, अशी मागणी जोर धरत आहे.



५ व ६ जून रोजी चंद्रपुरात वनक्षेत्रातील महिलांची राष्ट्रीय परिषद वन क्षेत्रात कार्यरत देशभरातील महिलांचे विविध विषयांवर मंथन

चंद्रपूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र वन विभागाद्वारे 'वनक्षेत्रातील महिला' या विषयावर चंद्रपूर वन प्रशासन विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी येथे ५ व ६ जून रोजी 'वनशक्ती २०२५' या वनक्षेत्रातील महिलांच्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. दोन दिवसीय या परिषदेमध्ये वन क्षेत्रात कार्यरत देशाच्या विविध भागांमधील महिला चर्चासत्रात उपस्थिती दर्शविणार आहेत.५ जून रोजी सकाळी १०.३० वाजता राज्याचे वन मंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होईल. कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून राज्याचे आदिवासी विकास विभाग मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके, खासदार नामदेव किरसान, खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार सर्वश्री अभिजीत वंजारी, सुधाकर अडबाले, सुधीर मुनगंटीवार, विजय वडेट्टीवार, किर्तीकुमार भांगडिया, किशोर जोरगेवार, देवराव भोंगळे, करण देवतळे, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलींद म्हैसकर, तेलंगाणाच्या वन बल प्रमुख श्रीमती सुवर्णा यांची उपस्थिती असेल.

उद्घाटनानंतर ५ जून रोजीच्या पहिल्या चर्चासत्रात पद्मश्री 'बीज माता' राईबाई पोपेरे, कर्नाटक वन विभागाचे सेवानिवृत्त वनअधिकारी मधू शर्मा, मोहर्लीच्या सरपंच सुनीता काटकर, बांबू क्षेत्रातील सामाजिक उद्योजक मिनाक्षी वाळके या सहभागी होतील. या चर्चासत्राचे नेतृत्व केंब्रिज विद्यापीठाच्या पीएच.डी स्कॉलर प्रेरणा बिंद्रा करतील. दुसऱ्या चर्चासत्रात आंध्र प्रदेश वन विभागाच्या सेवानिवृत्त विशेषज्ञ प्रधान मुख्य वनसंरक्षक सी. एस. रामलक्ष्मी, तेलंगणा वन विभागाच्या सुनीता भागवत आणि शिवानी डोगरा, केरळ वन विभागाच्या सेवानिवृत्त प्रधान मुख्य वनसंरक्षक प्रकृती श्रीवास्तव, मध्यप्रदेश वन विभागाच्या सेवानिवृत्त अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक डॉ. गोपा पांडे या सहभागी होतील. तेलंगणा वन विभागाच्या प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि वन दल प्रमुख शोभा रॉयुरू या चर्चासत्राचे नेतृत्व करतील.

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी ६ जून रोजीच्या चर्चासत्रात आरईएसक्यू चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्ष नेहा पंचमिया, गुजरात वन विभागाच्या रेंज फॉरेस्ट ऑफिसर रसिलाबेन वाढेर, मध्य प्रदेश वन विभागातील पन्ना व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्र संचालक अंजना तिर्की, पर्यावरण पत्रकार आणि संवर्धन जीवशास्त्रज्ञ बहार दत्त सहभागी होतील. दोन दिवसीय 'वनशक्ती २०२५' परिषदेमध्ये श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी बोटॅनिकल गार्डन, विसापूर आणि ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाला भेट देण्यात येणार आहे. येथे गट चर्चा, सादरीकरण तसेच वन्यजीव व्यवस्थापन आणि वन्यजीव संवर्धनात महिलांची भूमिका समजून घेतली जाणार आहे.

या चर्चासत्रांचे उद्दिष्ट महिलांच्या वनक्षेत्रातील अनुभवांची देवाणघेवाण, नेतृत्वातील अडचणींची चर्चा, आणि वनक्षेत्रात महिलांच्या सहभागासाठी धोरणात्मक मार्गदर्शन तयार करणे आहे. प्रत्येक चर्चासत्रामध्ये की नोट भाषणे, पॅनेल चर्चा, आणि अनुभव शेअरिंग सत्रे आयोजित केली जातील. या सत्रांमध्ये महिलांच्या वनक्षेत्रातील नेतृत्व, मैदानी भूमिकांमध्ये कायदेशीर सशक्तीकरण, आणि वन्यजीव क्षेत्रातील सहभाग यासारख्या विषयांवर चर्चा होईल. या चर्चासत्रांद्वारे महिलांच्या वनक्षेत्रातील योगदानाची ओळख पटवून, त्यांना आवश्यक असलेल्या धोरणात्मक, कायदेशीर, आणि संरचनात्मक समर्थनाची गरज अधोरेखित केली जाईल. परिषदेच्या शेवटी, महिलांच्या वनक्षेत्रातील सहभाग आणि नेतृत्व वाढवण्यासाठी एक धोरणपत्र तयार करण्यात येईल.चंद्रपूर वन अकादमीमध्ये होत असलेल्या या दोन दिवसीय परिषदेमध्ये सहभागी होण्यासाठी विदर्भ तसेच संपूर्ण राज्यातील महिलांनी मोठ्या संख्येत उपस्थित रहावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्याच्या प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) शोमिता बिस्वास यांनी केले आहे.

२ ते २० जून या कालावधीत विशेष कुष्ठरोग शोध अभियान

चंद्रपूर । प्रतिनिधी

भारत सरकारने कुष्ठरोगाचे निर्मूलन करण्याकरीता सर्व राज्यांना त्यांच्या प्रत्येक जिल्ह्याकरीता जिल्हा धोरणात्मक कृती आराखडा तयार करण्याबाबत सुचना दिल्या होत्या. चंद्रपर जिल्ह्यातील कुष्ठरुग्णांचे प्रमाण लक्षात घेवून मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह यांच्या मार्गदर्शनात जिल्हा धोरणात्मक कृती आराखडा तयार करण्यात आला. जिल्ह्यात नवीन कुष्ठरुग्णांचे प्रमाण शुन्यावर आणण्याकरीता सन २०२३ ते २०२७ या चार वर्षाच्या कालावधीत दर तीन महिन्यांनी विशेष कुष्ठरोग शोध मोहीम राबविण्यात येत आहे.

यातील तिसरी फेरी २ जुन ते २० जुन २०२५ या कालावधीत राबविण्यात येत आहे. तसेच राजुरा तालुक्यातील कुष्ठरोगाकरीता संवेदनशील असलेल्या २० गावात पिपल्स लेप्रा फाउंडेशन, हैद्राबाद या एन.जी.ओ. मार्फत सर्व्हेक्षण राबविण्यात येत असून संपूर्ण महाराष्ट्रात कुष्ठरोगासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत राबविण्यात येणारी ही पहिली मोहीम ठरली.सदर मोहीम ३४७ गावात राबविण्यात येणार असून मोहिमेदरम्यान ४८० टीम मार्फत १ लक्ष ३९ हजार १९८ घरांना भेटी देण्यात येईल. यात ५ लक्ष ८० हजार ९२४ नागरीकांची तपासणी करण्यात येणार आहे. सदर टीम घरांमधील सर्व सभासदांची कुष्ठरोग आजारासाठी शारिरीक तपासणी करण्यात येणार आहे. त्यामध्ये त्वचेवर फिकट / लालसर बधीर चट्टा, त्याठीकाणी घाम न येणे, जाड बधिर तेलकट /चकाकणारी त्वचा, त्वचेवर गाठी असणे, कानाच्या पाळया जाड होणे, भुवयांचे केस विरळ होणे, डोळे पूर्ण बंद करता न येणे, तळहातावर मुंग्या येणे, बधिरपणा अथवा जखमा असणे, हाताची व पायाची बोटे वाकडी असणे, हात मनगटापासुन किंवा पाय घोटयापासुन लुळा पडणे, त्वचेवर थंड व गरम संवेदना न जानवणे, हात व पायामध्ये अशक्तपणा जाणवणे, हातातुन वस्तु गळून पडणे, चालताना पायातुन चप्पल पडणे, इत्यादी. विशेष कुष्ठरोग शोध मोहीमेत ३४७ गावातील सर्व नागरीकांनी टीम मार्फत तपासणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) मीना साळुंखे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे व सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. संदीप गेडाम यांनी केले आहे.

मोदींच्या सभेनंतर वर्ध्यातील मैदाने बिघडली शिवसेना कडून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

वर्धा । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विश्वकर्मा योजने'च्या उद्घाटनासाठी वर्धा जिल्ह्यात आयोजित सभेची जोरदार चर्चा झाली होती. मात्र, या सभेमुळे स्थानिक खेळाडूंना वापरात असलेली अनेक मैदाने नुकसानग्रस्त झाल्याचा आरोप आता समोर येत आहे. त्यामुळे शिवसेना (उबाठा गट)तर्फे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.



शिवसेना शहरप्रमुख मिलन गांधी यांच्या नेतृत्वाखाली दिलेल्या निवेदनात सांगण्यात आले की, स्वावलंबी विद्यालयाचे मैदान मोठ्या दगडांनी भरलेले आहे, लोकविद्यालाच्या मैदानावर डांबरीकरण करून हेलिपॅड बनवण्यात आले आहे, त्यामुळे खेळाडूंना हेलिपॅडवरच सराव करावा लागत आहे. याशिवाय न्यू इंग्लिश हायस्कूल आणि जानकीदेवी बजाज महाविद्यालयाच्या मैदानांवर पार्किंगसाठी विषारी वायू निर्माण करणाऱ्या लोहमिश्रित स्लॅगचा वापर करण्यात आला, ज्यामुळे खेळताना खेळाडूंना इजा होत असल्याचेही निदर्शनास आले आहे.

वर्ध्यातील अनेक युवक व युवती पोलीस भरती व इतर शारीरिक प्रशिक्षणासाठी या मैदानांचा वापर करतात. मात्र, आता ही मैदाने खेळयोग्य न राहिल्याने त्यांचे नुकसान होत असल्याचे शिवसेनेच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सभेनंतर या मैदानांचे मूळ स्वरूप पूर्ववत करण्यात यावे आणि खेळाडूंना योग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली.या निवेदनप्रसंगी शिवसेनेच्या महिला संगठिका भारती कोटंबकर, तालुका संघटिका शालिनी दीक्षित, उपशहरप्रमुख विक्की शेंडे, मयूर बब्बनवार, सौरभ केचे, तुषार ठोंबरे, ऋतिक अतकर, मंगेश पारघने, शुभम बिरे, विनय सिद्दाम आदी उपस्थित होते.

वरोऱ्यात रिक्षाचालकांना मिळालं ५ कोटींचा अपघाती संरक्षण

स्व.बाळूभाऊ धानोरकर यांच्या स्मृति दिनानिमित्त समाजाभिमुख उपक्रम

वरोरा । प्रतिनिधी

वरोरा शहरात ३० मे रोज शुक्रवारला दिवंगत खासदार बाळूभाऊ धानोरकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त एक अत्यंत स्तुत्य आणि समाजाभिमुख उपक्रम राबविण्यात आला. शहरातील हजारो रिक्षाचालकांना अपघाती विमा संरक्षण देत, त्यांच्या मेहनतीला आणि जिद्दीला खरी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. रिलायन्स जनरल इन्शुरन्सच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रमात प्रत्येकी दहा लाख रुपयांच्या अपघाती विमा संरक्षणाचे वाटप करण्यात आले असून, एकूण विमा कवचाची रक्कम जवळपास पाच कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे.



शहरात रात्रंदिवस रस्त्यावर असणाऱ्या रिक्षाचालकांचं आयुष्य हे अनिश्चिततेच्या सावलीत चालणारं असतं. अपघात, गंभीर दुखापत, आर्थिक अडचणी यांची भीती सतत त्यांच्या मागे असते. अशा परिस्थितीत एवढं मोठं विमा कवच मिळणं, ही त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी मोठी दिलासादायक बाब ठरत आहे. या योजनेअंतर्गत केवळ अपघाती मृत्यूचं नव्हे, तर गंभीर अपंगत्व, अपघातानंतरचा वैद्यकीय खर्च आणि अन्य बाबतीतही आर्थिक मदतीची तरतूद करण्यात आली आहे.या उपक्रमामागे दिवंगत खासदार बाळूभाऊ धानोरकर यांच्या कार्यकर्तृत्वाला व समाजकार्याला मानवंदना देण्याचा उद्देश असून, कामगारवर्गाच्या जीवनात सुरक्षा व स्थैर्य निर्माण व्हावं, ही त्यामागची खरी भावना असल्याचं उपक्रमाचे मुख्य समन्वयक वरोरा विधानसभा क्षेत्राचे युवक काँग्रेस अध्यक्ष शुभम चिमुरकर यांनी सांगितलं. बाळूभाऊंचं आयुष्य म्हणजे सामान्य माणसाच्या हक्कांसाठी झगडण्याची प्रेरणा आहे. त्यांच्या स्मृतीदिनी त्यांच्या विचारांना कृतीची साथ देत आम्ही हा उपक्रम हाती घेतला आहे,असंही त्यांनी भावनिक शब्दांत स्पष्ट केलं.या उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात शुभम चिमुरकर यांचा पुढाकार महत्त्वपूर्ण ठरला आहे. त्यांच्या पुढाकारातून आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या नेतृत्वातील सामाजिक जाणिवांमधून या उपक्रमाला मूर्त स्वरूप मिळालं. या प्रसंगी प्रवीण काकडे, सुभाष दांडडे, निलेश भालेराव, राकेश पॉल, राकेश दोंतावार, सुनील जवदंड यांच्यासह अनेक मान्यवर आणि कार्यकर्ते उपस्थित होते.शहरात आज रिक्षाचालकांच्या चेहऱ्यावर जे हास्य दिसत होतं, ते केवळ विमा कागदपत्रांमुळे नव्हतं, तर कोणी आपल्यासाठी विचार करतंय या विश्वासामुळे होतं. हा उपक्रम केवळ आर्थिक सहाय्य नव्हे, तर एक सामाजिक बांधिलकी आहे. बाळूभाऊंच्या स्मृतीला ही खरी आदरांजली ठरावी, आणि भविष्यातही असे उपक्रम श्रमिकवर्गासाठी प्रेरणादायी ठरावेत, अशीच सर्वत्र भावना व्यक्त होत आहे.

संजय गाते यांचे पुलगावात जल्लोषात स्वागत



पुलगाव । प्रतिनिधी

वर्धा जिल्हा भाजपच्या अध्यक्षपदी नुकतीच नियुक्ती झालेल्या भाजप नेते संजय गाते यांचे पुलगाव शहरात ढोल-ताशांच्या गजरात, फटाक्यांच्या आतषबाजीने आणि मिरवणुकीद्वारे जोरदार स्वागत करण्यात आले.संजय गाते हे भाजप प्रदेश ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष असून त्यांची वर्धा जिल्हा भाजप अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर सर्वत्र आनंद व्यक्त करण्यात येत आहे. वर्ध्यातील जिल्हा कार्यालयात त्यांचे प्रथम स्वागत झाल्यानंतर पुलगाव येथे आगमन होताच शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.ढोल-ताशा, फटाके, गुलाल आणि मिठाई वाटप यांसह शहरातून मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत प्रदेश कार्यकारिणी सदस्य राजीव बत्रा, शहराध्यक्ष प्रशांत इंगोले, माजी शहराध्यक्ष नितीन बडगे हे संजय गाते यांच्यासोबत खुल्या जीपमधून सहभागी होते.

शहरातील विविध सामाजिक संघटनांच्या वतीने तसेच नागरिकांनी चौकाचौकात त्यांचे स्वागत केले. मिरवणुकीदरम्यान प्रमुख चौकांमध्ये फटाक्यांची आतषबाजी व पुष्पवृष्टी करण्यात आली.मिरवणूक एकता चौक येथून सुरू होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भगतसिंग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, आणि पवनसुत हनुमान मंदिर या प्रमुख ठिकाणी माल्यार्पण व पूजन करून समाप्त झाली.या भव्य मिरवणुकीत भाजप पदाधिकारी, विविध आघाड्यांचे कार्यकर्ते, समाजसेवी, युवक व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना

रामाळा तलावाच्या संरक्षण भिंतीच्या कामाची आमदार किशोर जोरगेवार यांच्याकडून पाहणी

चंद्रपूर । प्रतिनिधी

चंद्रपूरच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक ओळखीचा अविभाज्य भाग असलेल्या रामाळा तलावाच्या संरक्षणासाठी ३० कोटी रुपयांच्या निधीतून सुरू असलेल्या संरक्षण भिंत बांधकामाची आमदार किशोर जोरगेवार यांनी काल रविवारी पाहणी केली. या पाहणीदरम्यान संबंधित अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. या कामामुळे तलावाचे जतन, सौंदर्यीकरण आणि परिसरातील सार्वजनिक सुरक्षिततेची खात्री होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला .यावेळी चंद्रपूर महानगरपालिकेचे अभियंता शिडाम यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे महानगर जिल्हाध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, माजी नगरसेवक देवानंद वाढई, प्रदीप किरमे, प्रशांत चौधरी, शिवसेना शहरप्रमुख बंडू हजारे, रामाळा तलाव बचाव संवर्धन संघर्ष समितीचे जुगल सोमानी, सुधीर बजाज, विनोद सोन, राशिद हुसेन, नकुल वासमवार, संजय बोरघाटे, कार्तिक बोरेवार, आदी उपस्थित होते.

रामाळा तलाव हा शहराच्या मध्यवर्ती भागात असून, शतकानुशतकं पासून नागरिकांच्या जीवनशैलीशी निगडित आहे. तलावाच्या नैसर्गिक आणि ऐतिहासिक हत्त्वामुळे त्याचे जतन करणे ही काळाची गरज आहे. या अनुषंगाने शासनाच्या ३० कोटी रुपयांच्या निधीतून संरक्षण भिंतीचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामाची आमदार किशोर जोरगेवार यांनी पाहणी केली. पाहणीदरम्यान अधिकाऱ्यांना कामाच्या दर्जावर भर देण्याच्या सूचना देण्यात आल्या. हे काम दर्जेदार, मजबूत आणि वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे. नागरिकांच्या भावना या तलावाशी जोडलेल्या आहेत. त्यामुळे या कामात कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी दक्षता घ्यावी, असे निर्देश यावेळी देण्यात आले.भिंतीच्या बांधकामामुळे तलावाच्या किनाऱ्यांचे संरक्षण होईल आणि तलावात गाळ जाण्याचे प्रमाण कमी होईल. परिणामी, तलावाचे पाणी शुद्ध राहील आणि परिसरातील जैवविविधतेलाही चालना मिळणार आहे. तलावाच्या संरक्षणाच्या या प्रकल्पामुळे केवळ चंद्रपूरच्या ऐतिहासिक ओळखीचेच नव्हे, तर जैवविविधता आणि पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी मोठी मदत होईल. रामाळा तलाव हे चंद्रपूरचे भूषण आहे. या तलावाचे जतन करण्यासाठी निधी मंजूर झालेला आहे. काम वेळेत पूर्ण व्हावे, यासाठी अधिकारी आणि अभियंते सातत्याने प्रयत्नशील आहेत. नागरिकांची अपेक्षा आणि तलावाचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असेही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी सांगितले.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सह्याद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .